सोलापूर जिल्हयातील अध्यापक विदयालयातील छात्राध्यापकांच्या व्यावसायिक अभिरूचीचा भावनिक व सामाजिक परिपक्वतेशी असणा-या सहसंबंधाचा अभ्यास

स्वा . रा . ती . म . विद्यापीठ ,नांदेड अंतर्गत पीएच . डी . (शिक्षणशास्त्र)

पदवीसाठी सादर केलेला संशोधन आराखडा

संशोधक

सुभाष रघुनाथ माळी

मार्गदर्शक

डॉ . सरीता नागोराव गाडेगांवकर

संशोधन स्थळ

शिक्षणशास्त्र संकुल ,नांदेड .

सन

डिसेंबर २०१९

अनुक्रमणिका

प्रकरण	प्रकरणाचे नांव	पान क्रमांक
१	**प्रस्तावना**	**0३**
१.१	शीर्षक	0६
१.२	संशोधनाची गरज	0६
१.३	संशोधनाचे महत्त्व	0७
१.४	समस्या विधान	0७
१.५	संशोधनाची उद्दिष्टये	0७
१.६	गृहितके	0७
१.७	संज्ञांच्या कार्यात्मक व्याख्या	0८
१.८	संशोधनाची व्याप्ती	0८
१.९	संशोधनाची मर्यादा	0८
२	**संबंधित साहित्याचा व संशोधनाचा आढावा**	**0९**
२.१	संबंधित साहित्याचा आढावा	0९
२.२	संबंधित संशोधनाचा आढावा	१0
२.३	प्रस्तुत संशोधनाचे वेगळेपण	११
३	**संशोधनाची कार्यपध्दती**	**१२**
३.१	संशोधनाची पध्दती	१२
३.२	संशोधनाची कार्यवाही	१३
३.३	जनसंख्या	१४
३.४	नमुना निवड	१४
३.५	संशोधनाची साधने	१५
३.६	संशोधनाची संख्याशास्त्रीय परिमाणे	१६
४	**माहिती संकलन व अर्थनिर्वचन**	**१६**
*	संशोधनाचे कालावधीचे नियोजन	१६
*	संशोधन खर्चाचे अंदाजपत्रक	१७
*	संदर्भसूची	१७

१ . प्रस्तावना :

प्रत्येकाला व्यक्तिला शालेय किंवा महाविदयालयीन शिक्षण पूर्ण झाल्यानंतर नोकरी व्यवसायाच्या दृष्टिने विचार करावा लागतो . सद्याची वैज्ञानिक प्रगती ,औद्योगिकीकरण , जलद बदल यामुळे शिक्षण तसेच नोकरी व्यवसायाची क्षेत्रे प्रचंड प्रमाणात वाढलेली आहेत . शिक्षण , नोकरी व्यवसाय यातील वाढलेल्या संधी, वैविध्यता व व्यक्तीमधील क्षमता भिन्नता यामुळे शिक्षण क्षेत्र किंवा नोकरी व्यवसाय निवडताना व त्या क्षेत्रात समायोजन साधताना विद्यार्थ्यांना अडचणी येतात .

प्रत्येक व्यक्तिमध्ये असणा-या क्षमता या भिन्न असतात . मग तो ग्रामीण असो की शहरी , स्त्री असो की पुरूष . संधी व क्षेत्रांच्या विविधतेमुळे शिक्षणक्रम व नोकरी-व्यवसाय क्षेत्र निवडताना विद्यार्थ्यांना आपल्या क्षमता ,आवडीनिवडी,आवश्यक भावनिक तसेच सामाजिक परिपक्वता, करावे लागणारे समायोजन याविषयी पुरेशी माहित नसते .

अभिरूची /आवड -

'आवड म्हणजे व्यक्तिचा विशिष्ट व्यक्ति , वस्तू , परिस्थती इ . कडे असणारा व्यक्तिचा कल होय .'

व्यावसायिक अभिरूची -

'व्यक्तिचा व्यावसायिक शिक्षणक्रम , व्यवसाय याकडे विद्यार्थ्याचा असणारा कल म्हणजे व्यावसायिक अभिरूची असे म्हणता येईल .'

व्यक्तिच्या या अभिरूचीशी तीची भावनिक व सामाजिक परिपक्वता यांचा निकटचा संबंध असतो . कारण विद्यार्थ्यामध्ये आवश्यक तितकी भावनिक व सामाजिक परिपक्वता आलेली नसल्यास त्याचा व्यावसायिक तसेच शैक्षणिक निवडीवरही परिणाम होतो .

भावनिक परिपक्वता -

व्यक्मित्त्वाच्या अनेक अंगापैकी भावनिक विकास किंवा भावनिक परिपक्वता हे एक महत्त्वाचे अंग आहे , कारण याचा व्यक्तिमत्त्व विकासावर खूप परिणाम होतो . भावनिक परिपक्वता ही केवळ व्यक्तिमत्त्वाचा प्रभावी निर्धारक नाही तर वैयक्तिक विकासाच्या वाढीवर नियंत्रण ठेवण्यासही मदत करते .

भावनिक परिपक्वतेचा अर्थ अनेक मानसशास्त्रज्ञांनी वेगवेगळा सांगितलेला आहे ते त्यांच्या विविध व्याख्येतून दिसून येतो .

१. 'भावनिक परिपक्वता म्हणजे संतुलित व्यक्तिमत्त्व होय.' - दोसांझ

२. भावनिक परिपक्वता याचा अर्थ असा आहे की एखादया व्यक्तिला त्याच्या जीवनशैलीची श्रीमंततेची जाणीव झाली आहे आणि त्याने आनंद घेण्याची स्वत:शी , इतरांशी संबंधित राहण्याची , प्रेम करण्याची आणि हसण्याची क्षमता विकासीत केली आहे. - जर्सिल

३. भावनिक परिपक्वता म्हणजे भावनांना न रोखता बहुतेक समाजमान्य पध्दतीने वागणे , यात बाहय नियंत्रणाऐवजी भावनांचे अंतर्गत नियंत्रण अपेक्षित असते.

व्यक्तिचे नातेसंबंध हे भावनिक विकासावर अवलंबून असतात. आपलं नात समजून घेण्याचा उत्तम मार्ग म्हणजे स्वत:चे मत समजून घेणे. आपले संबंध सुधारण्याची इच्छा असलेल्या कोणत्याही व्यक्तिसाठी एकमेव सर्वात महत्त्वाचे कार्य म्हणजे त्याचा आत्मविश्वास आणि भावनिक परिपक्वता वाढवणे. एखादयाचे वर्तनाची योग्यायोग्यता ठरवताना त्याच्या भावना आणि भावनिक अपरिपक्वता आणि भावनिक परिपक्वता याचा विचार केला जातो. भावनिक परिपक्वता ही सापेक्ष संज्ञा आहे. ही वय आणि व्यक्तिच्या विकासाच्या टप्प्यांशी थेट संबंधित आहे. भावनिक परिपक्वता ही एखादया व्यक्तीच्या आयुष्यात यशस्वी होण्याच्या पातळीवरील महत्त्वपूर्ण भविष्यवाणी असते.

भावनिकदृष्टया परिपक्व व्यक्तिची लक्षणे -

१. संतुलीत व्यक्तिमत्त्व

२. वास्तविकतेला सामोरे जाणे.

३. आनंद घेणे व प्रेम करणे.

४. स्वत:कडे वस्तुनिष्ठतेने पाहणे.

५. भावनिकदृष्टया परिपक्व व्यक्तिमध्ये आत्मविश्वास असतो.

६. जीवनातील अनुभवांशी सकारात्मकतेने संबंध ठेवणे.

७. तणाव सहन करण्याची क्षमता असणे.

८. स्वत:च्या चुकांची जबाबदारी स्वत: घेतात.

९. पुरेसे आत्मनियंत्रण व स्वाभिमान दिसून येतो.

१0. स्वत:पुरता विचार न करता इतरांचाही विचार करतात.

११. योग्य वेळी व योग्य ठिकाणी भावना प्रकट करणे.

१२. टिकेमुळे विचलीत न होता सकारात्मकतेने घेतात.

१३ . इतरांशी प्रेमाने व आपुलकीने वागतात .

१४ . अनुभवातून शिकण्याची क्षमता असते .

१५ . मोकळया मनाने दुस-याचे मत ऐकतात .

सामाजिक परिपक्वता -

व्यक्तिमत्त्व विकासाच्या अनेक पैलू पैकी सामाजिक विकास किंवा परिपक्वता हा एक महत्त्वाचा पैलू आहे . ॲरिस्टॉटल यांनी basically man is an animal असे म्हंटले आहे . मानव समाजात रहात असल्याने त्याच्या सहकार्य ,सुरक्षा यासारख्या अनेक गरजा पूर्ण होतात . शालेय अभ्यासक्रमातील पाठयक्रम ,अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रमांव्दारे सामाजिक विकास घडवण्याचा प्रयत्न करावा लागतो . सामाजिक परिपक्वता विद्यार्थ्याला स्पर्धा आणि अडचणींच्यावेळी सकारात्मक आणि उत्पादक निर्णय घेण्यात सक्षम बनवते .

सामाजिक परिपक्वतेचा अर्थ वेगवेगळा सांगितला जातो , तो विविध व्याख्येतून दिसून येतो .

१ . 'सामाजिक परिपक्वता म्हणजे सामाजिक संबंधामध्ये परिपक्वता प्राप्त करणे होय .'

२ . 'सामाजिक परिपक्वता ही सामाजिक कौशल्याची आणि जागरूकतेची पातळी आहे . जी एखादया व्यक्तिने प्राप्त केली आहे .'

३ . 'सामाजिक परिपक्वता म्हणजे सामाजिक आणि व्यावसायिक क्षमतेतील वाढीचा अंश होय .'

सामाजिक परिपक्वतेचे घटक व परिमाने -

अ) वैयक्तिक योग्यता -

१ . कामाशी संबंधित कौशल्ये आणि कामाबद्दल योग्य वृत्ती विकसित करणे .

२ . कामामध्ये आनंद अनुभवण्याची क्षमता की ज्यामुळे आत्मविकास वाढतो .

३ . स्वत:ची स्वतंत्र दिशा निवडून स्वतंत्रपणे कार्य करणे .

४ . ताण घेणाची क्षमता असणे .

५ . भावनिक स्थिरता असणे .

ब) पारस्परिक योग्यता -

१ . व्यक्तिमधील संवादात अर्थपूर्ण बोलणे ,इतरांचे हावभाव समजून घेणे ,संप्रेषण करण्याची तसेच स्पष्टीकरण करण्याची क्षमता .

२ . संवेदनशिलता व प्रभावी संप्रेषण क्षमता .

३. विश्वास ,सहकार्य यासाठी प्रयत्न करणे.

क) सामाजिक योग्यता -

१. सामाजिक वचनबध्दता -एकतेची भावना ,सामुहिक हितासाठी वैयक्तिक उद्दिष्टे सुधारण्याची किंवा त्याग करण्याची तसेच उद्दिष्टांसाठी प्रयत्न करण्याची क्षमता.

२. सामाजिक सहिष्णूता , इतर व्यक्ती व गट यांच्याशी संवाद साधणेची क्षमता.

३. बदलण्यासाठी मोकळेपणा - सामाजिक व्यवस्थेमधील बदल स्विकारण्याची आणि बदलाच्या मागणीनुसार स्वत:ला अनुकूल बनवण्याची तयारी.

प्रस्तुत सद्यस्थिती विचारात घेता संशोधकाला किमान उच्च माध्यमिक स्तरावर किंवा नोकरी-निवडल्यानंतर विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीनिवडीचा विचार करून पुढील शिक्षणक्रम , नोकरी-व्यवसाय क्षेत्राची निवड व त्या क्षेत्रातील समायोजन करावे असे वाटते. त्यामुळेच या स्तरावरील विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक अभिरूची तसेच भावनिक व सामाजिक परिपक्वता यांचा अभ्यास करणे महत्त्वाचे वाटले. त्यामुळे प्रस्तुत क्षेत्र व समस्या संशोधकाने निवडलेले आहे.

१.१ शीर्षक :

सोलापूर जिल्हयातील अध्यापक विदयालयातील छात्राध्यापकांच्या व्यावसायिक अभिरूचीचा भावनिक व सामाजिक परिपक्वतेशी असणा-या सहसंबंधाचा अभ्यास

१.२ संशोधनाची गरज :

प्रत्येक व्यक्तिला वेगवेगळया गोष्टीमध्ये आवड असते. कपडे , खादयपदार्थ , संगीत , गाणी , नृत्य , खेळ , छंद , पुस्तके , चित्रपट , मालिका , इंटरनेटचा वापर अशा अनेकविध क्षेत्रामध्ये प्रत्येकाची आवड भिन्न असते. आवड किंवा अभिरूची ही ज्ञान , शिक्षण , यश , परिपक्वता तसेच मार्गदर्शन यानुसार बदलताना दिसून येते.

माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर पुढील शिक्षणक्रम निवडताना भविष्यातील नोकरी-व्यवसायाची क्षेत्रे व संधीचा विचार करावा लागतो. शिक्षणक्रम , नोकरी-व्यवसायाचे क्षेत्र निवडताना किंवा निवडल्यानंतरही त्या क्षेत्रामध्ये यशस्वी होण्यासाठी आवश्यक क्षमता , कौशल्ये व आपल्यातील क्षमता , आवडनिवड , निवडणा-या किंवा निवडलेल्या क्षेत्राचे महत्त्व याचाही विचार करणे आवश्यक असते. कारण आवडीचा संबंध त्या क्षेत्रातील यश व समाधानाशी असतो.

१.३ संशोधनाचे महत्त्व :

संशोधक व्यावसायिक प्रशिक्षणांशी संबंधित असलेने व विद्यार्थी शिक्षणक्रम,व्यवसाय निवडताना अभिरूचीचा पुरेसा विचार न करता सहज उपलब्धता,मित्रमैत्रिणीचा कल ,पालकांच्या अपेक्षा, आर्थिक कुवत, नोकरी-व्यवसायाची संधी,सद्यस्थितीमध्ये संबंधीत क्षेत्राचे महत्त्व याचा विचार करून निवड करतात.

संशोधकाने वस्तूस्थिती पाहिल्याने , जाणवल्याने विद्यार्थ्यांच्या अभिरूचीचे मापन व्हावे असे वाटते. त्यामुळे या क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या अभिरूचीचे मापन करणे महत्त्वाचे आहे असे वाटते.

१.४.समस्या विधान :

सोलापूर जिल्हयातील अध्यापक विदयालयातील छात्राध्यापकांच्या व्यावसायिक अभिरूचीचा भावनिक व सामाजिक परिपक्वतेशी असणा-या सहसंबंधाचा अभ्यास

१.५. संशोधनाची उद्दिष्टे :

१. अध्यापक विदयालयातील छात्राध्यापकांच्या व्यावसायिक अभिरूचीचा शोध घेणे.

२. अध्यापक विदयालयातील छात्राध्यापकांच्या भावनिक परिपक्वतेचा शोध घेणे.

३. अध्यापक विदयालयातील छात्राध्यापकांच्या सामाजिक परिपक्वतेचा शोध घेणे.

४.अध्यापक विदयालयातील छात्राध्यापकांच्या व्यावसायिक अभिरूची व भावनिक परिपक्वता यांच्यातील सहसंबंधाचा शोध घेणे.

५.अध्यापक विदयालयातील छात्राध्यापकांच्या व्यावसायिक अभिरूची व सामाजिक परिपक्वता यांच्यातील सहसंबंधाचा शोध घेणे.

१.६.संशोधनाची गृहितके :

१. विद्यार्थ्यांना स्वत:च्या अभिरूचीची पुरेशी कल्पना नसते.

२. विद्यार्थ्यांना नोकरी व्यवसायातील अभिरूचीच्या विविध क्षेत्राविषयी पुरेशी माहिती नसते.

३. विद्यार्थ्यांची अभिरूची क्षेत्रे भिन्न असतात.

४. विद्यार्थ्यांना स्वत:च्या भावनिक परिपक्वतेविषयी पुरेशी माहिती नसते.

५. विद्यार्थ्यांना स्वताच्या सामाजिक परिपक्वतेविषयी पुरेशी माहिती नसते.

१.७ संज्ञांच्या कार्यात्मक व्याख्या :

सोलापूर जिल्हा : महाराष्ट्रातील अनेक जिल्हयापैकी एक जिल्हा.

अध्यापक विद्यालय : प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना अध्यापन करण्यासाठी आवश्यक सेवापूर्व प्रशिक्षण देणारे विद्यालय.

छात्राध्यापक : अध्यापक विदयालयात प्रशिक्षण घेणारे विद्यार्थी

व्यावसायिक अभिरूची : एखादा व्यावसायिक शिक्षणक्रम , व्यवसाय याकडे विद्यार्थ्यांचा असणारा कल म्हणजे व्यावसायिक अभिरूची असे म्हणता येईल.

भावनिक परिपक्वता : भावनिक परिपक्वता म्हणजे वाढत्या वयानुसार भावनिक प्रकटीकरणा - मध्ये अपेक्षित असणारा विकास व संतुलन होय.

सामाजिक परिपक्वता : सामाजिक परिपक्वता म्हणजे वाढत्या वयानुसार व्यक्तिच्या सामाजिक संबंधामध्ये अपेक्षित असणारा विकास व संतुलन होय.

१.८ संशोधनाची व्याप्ती :

१. संशोधनामध्ये सोलापूर जिल्हयाचा विचार केला जाणार आहे.

२. सोलापूर जिल्हयातील ४४ विद्यालयापैकी साधारणत: ५० टक्के अध्यापक विद्यालयाचा विचार केला जाणार आहे.

३. संशोधनामध्ये अध्यापक विद्यालयातील विद्यार्थ्यांच्या विविध क्षेत्रातील अभिरूची शोधली जाईल.

४. संशोधनामध्ये अध्यापक विद्यालयातील विद्यार्थ्यांच्या भावनिक व सामाजिक परिपक्वतेचे मापन केले जाईल.

५. संशोधनामध्ये अध्यापक विद्यालयातील विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक अभिरूची , भावनिक व सामाजिक परिपक्वता यांतील सहसवंध शोधला जाईल.

६. सदरचे संशोधन हे शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील विद्यार्थ्यांसाठी आहे.

१.९.संशोधनाची मर्यादा :

१. सदर संशोधन हे सोलापूर जिल्हयापुरतेच मर्यादित असेल.

२. सदर संशोधन हे अध्यापक विदयालयातील प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांपुरतेच मर्यादित असेल.

३. संशोधन हे एम.एन.पलसाने यांच्या ‘आपली आवड-निवड’ अभिरूची शोधिके पुरतेच

मर्यादित असेल .

४ . संशोधन हे वाय .सिंग व एम .भार्गव यांची ‘भावनिक परिपक्वता कसोटी’ या क्षमता कसोटी पुरतेच मर्यादित असेल .

५ . संशोधन हे आर .पी .श्रीवास्तव यांची ‘सामाजिक परिपक्वता कसोटी’ या क्षमता कसोटी पुरतेच मर्यादित असेल .

२ . संबंधित साहित्याचा व संशोधनाचा आढावा

२ .१ संबंधित साहित्याचा आढावा :

नव्या संशोधकाला संशोधनाची योग्य दिशा देणारे साहित्य म्हणजे संबंधित साहित्य होय . संबधित साहित्य हे दिशादर्शकाची भूमिका बजावत असते. संशोधकाला आपल्या विषयाच्या संदर्भात आवश्यक माहिती संबंधित साहित्यातून मिळत असते. संशोधन विषयाच्या संदर्भात अगदी सुरूवातीपासून संशोधकाने जी पुस्तके , माहिती पुस्तीका , कसोटीची हस्तपुस्तिका व विविध संकेत स्थळावरून प्राप्त माहिती इ. साहित्य वाचले , त्याचा आढावा पुढिलप्रमाणे .

१ .कळके , शिरगावे , शेंडगे ,(सप्टेंबर २००८)अध्ययनार्थीचे मानसशास्त्र आणि अध्यापन प्रक्रिया कोल्हापूर : फडके प्रकशन .

सदरील पुस्तकामध्ये अभिरूची ही संकल्पना काय आहे .वाढत्या वयानुसार अभिरूचीचा विकास कसा होतो. अध्ययन , शैक्षणिक प्रगती , शैक्षणिक निवडप्रक्रिया यावर ब-याचदा वय , बुध्दिमत्ता , अवधान , अभिरूची , थकवा , प्रेरणा व परिपक्वता इ. घटक परिणाम कशाप्रकारे होतो याविषयी माहिती देण्यात आलेली आहे .

२ .पळसाने, एम .एन .,(ऑगस्ट १९७७)आपली आवड-निवड अभिरूची शोधिका हस्तपुस्तिका .पुणे : आनंद एजन्सीज .

सदरील अभिरूची शोधिकेमध्ये विद्यार्थ्याच्या अभिरूचीची विविध १३ क्षेत्रांचे मापन करणारी विधाने देण्यात आलेली आहेत, ज्याव्दारे अभिरूचीचे मापन करता येते .

३ .पंडीत बन्सी बिहारी (१९९0)- शिक्षणातील संशोधन (संख्यात्मक व गुणात्मक)

सदरील पुस्तकामध्ये संशोधन,शैक्षणिक संशोधन तसेच संशोधन प्रक्रिया याविषयी सविस्तर माहिती देण्यात आलेली आहे .

४ . बोरुडे रा . र .,कुमठेकर मेघा, देसाई भरत ,गोळविलकर शिला (१९९०) . वैकासिक मानसशास्त्र . पुणे : पुणे विद्यार्थीगृह प्रकाशन .

सदरील पुस्तकामध्ये बालविकासाच्या विविध अवस्था , वाढत्या वयानुसार बालकांमध्ये होणारा मनोरंजनात्मक , सामाजिक , वैयक्तिक , शैक्षणिक , व्यावसायिक व धार्मिक यांतील अभिरूची विकास देण्यात आलेला आहे .

५ . हिरवे आर . एस .,तडसरे व्ही . डी . (१९९७)वैकासिक मानसशास्त्र . कोल्हापूर :फडके प्रकाशन

सदरील पुस्तकामध्ये शिक्षणक्रम व व्यवसाय निवडीवर व्यक्तिमत्त्व ,बुध्दिगुणांक ,अभिक्षमता , अभिरूची , आदर्श , मूल्ये , परंपरा , संधी ,शिक्षण, सामाजिक दर्जा ,आर्थिक दर्जा , कौटुंबिक , पार्श्व भूमी , धार्मिक वातावरण , लिंग , पालकांचा नोकरी-व्यवसाय , त्यांचे प्रोत्साहन व आर्थिक पाठबळ इ . चा परिणाम व प्रभाव पडतो याविषयीची माहिती देण्यात आलेली आहे .

२ . २ संबंधित संशोधनाचा आढावा :

1. Aminabhavi Vijayalaxmi (Ph.D. 1993)

   A Study of Quality of Life , Vocational Interests and Job Involvement of Professional (Ph.D . Psy. 1993)

   जविनाची गुणवत्ता , व्यावसायिक अभिरूची व नोकरी व्यवसायातील सहभागासंदर्भात अभ्यास केलेला आहे .

2. Doobal Shipra (Ph.D. 2014)

   A Study of Vocational Interest and Achievement Motivation of Higher Secondary School Students in relation to Gender , Area , Type of Family and Faculty. (Ph.D. Psy. 2014)

   उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांची व्यावसायिक अभिरूची व संपादन प्रेरणेचा लिंग , क्षेत्र , कुटुंबाचा प्रकार व विद्याशाखा यांच्या संदर्भाने अभ्यास केलेला आहे .

3. Havalappanavar N.B. (Ph.D. 1989)

   A Study of work Values of Socio-Culturally Differing Professional and Non Professional College Students in Relation to Psychological Factors – Personal Needs and Academic Achievement.

सामाजिक -सांस्कृतिक दृष्टया वेगवेगळया व्यावसायिक तसेच बिगरव्यावसायिक महाविदयालयातील विद्यार्थ्यांच्या कार्यमूल्यांचा व्यावसायिक गरजा , व्यावसायिक अभिरूची आणि शैक्षणिक संपादन या मानसशास्त्रीय घटकांच्या संदर्भात अभ्यास केलेला आहे .

4. Kumbhakarn Nilesh Digamber (Ph.D. 2013)

   Personality Traits , Vocational Interest and Career Maturity : A Correlational Study. (Ph.D. Psy. 2013)

   व्यक्तिमत्त्व गुण , व्यावसायिक अभिरूची आणि करिअर पक्वता यांचा सहसबंधात्मक अभ्यास केलेला आहे .
5. Pal Ashok A. (Ph.D. 1988)

   A Study of Intelligence , Vocational Interest , Creativity , Academic Achievement of Socially Disadvantaged and Advantaged. (Ph.D. Psy. 1988)

   सामाजिक दृष्टया वंचीत व हितकरांची बुध्दिमत्ता , व्यावसायिक अभिरूची , सर्ज नशीलताा व शैक्षणिक संपादन यांचा अभ्यास केलेला आहे .
6. Pandey Surendra Prasad (Ph.D. 2002)

   Academic Performance of Under Graduate Students in Relation to Socio-Psychological Factors and Vocational Interest. (Ph.D. Psy. 2002)

   पदवीधर विद्यार्थ्यांची शैक्षणिक कामगिरी , मनोसामाजिक घटक व व्यावसायिक अभिरूची यासंदर्भात अभ्यास केलेला आहे .
7. Thakor Hina P. (Ph.D. 2013)

   A Study of Vocational Interest of Higher Secondary School Students in Context of Some Variables. (Ph.D. Psy. 2013)

   उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक अभिरूचीचा काही परिवर्त कांच्या संदर्भाने अभ्यास केलेला आहे .

२ .३ प्रस्तुत संशोधनाचे वेगळेपण :

विद्यार्थ्याच्या अभिरूची बावत काही संशोधने यापूर्वी झालेली आहेत . पण ही संशोधने विविध विषयातील अभिरूची बावतची आहेत .तसेच काही संशोधने ही माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक ,व्यावसायिक अभिरूची बावत झालेली आहेत .

प्रस्तुत संशोधन हे अध्यापक विद्यालयातील विद्यार्थ्यांच्या अभिरूची शोधण्यासाठी करण्यात येणार आहे व सोलापूर जिल्हा या भौगोलिक क्षेत्रातील विद्यार्थ्यांशी संबंधित आहे . यापूर्वी अशा प्रकारची संशोधने झालेली नाहीत व हेच प्रस्तुत संशोधनाचे वेगळेपण आहे .

३. संशोधनाची कार्यपध्दती :

३.१ संशोधन पध्दती : जीवनात अनेक समस्यांना तोंड दयावे लागते त्या समस्या सोडविण्यासाठी केलेली विचार क्रिया म्हणजे संशोधन .

१.संशोधन म्हणजे एखादी गोष्ट शोधून काढण्यासाठी सतत व पध्दतशीर केलेले परिश्रम होय.

२.संशोधनाची उद्दिष्टे , गृहितके ,परिकल्पना ,कार्यात्मक व्याख्या इ.ची मांडणी केल्यानंतर संशोधनासाठी आवश्यक माहितीच्या संकलनासाठी व संकलित माहितीच्या विश्लेषणासाठी संशोधन पध्दतीची आवश्यकता असते . शैक्षणिक संशोधनाचे पुढील तीन प्रकार पडतात.

१.ऐतिहासिक संशोधन पध्दती २.प्रायोगिक संशोधन पध्दती ३.वर्णनात्मक संशोधन पध्दती

सर्वेक्षण हे वर्तमानकाळाशी संदर्भीत असते.अभ्यासाविषयांच्या विविध क्षेत्रातील वर्तमान स्थिती निश्चित करणे हाच सर्वेक्षणाचा उद्देश आहे.वरील तीन पध्दतीपैकी संशोधकाने वर्णनात्मक संशोधन प्रकारातील शालेय सर्वेक्षण पध्दतीचा वापर करण्याचे ठरविले आहे.

सर्वेक्षण पध्दतीची व्याख्या ः

१. सर्वेक्षण म्हणजे प्रचलीत तथ्थ्यांचे संकलन ,वर्णन आणि स्पष्टीकरण होय.

२.प्रश्न विचारण्याच्या काळजीपूर्वक आयोजिलेल्या पध्दती आणि नमुना निवडीच्या शास्त्रीय पध्दती याचा वापर केलेले शैक्षणिक समस्यांचे संशोधन म्हणजे सर्वेक्षण होय.

सर्वेक्षणाचा हेतू ः

१.सर्वेक्षणाचा प्रमुख हेतू वर्तमान स्थितीचा शोध घेणे हा आहे.

२.संशोधनकर्त्याला समस्यांची उकल करण्याची प्रारंभिक पायरी म्हणून उपयोग होतो.

३.विविध शालेय उपक्रमाचे नियोजन करण्यास सर्वेक्षणाची मदत होते.

सर्वेक्षणाची वैशिष्टे ः

१.सर्वेक्षण पध्दतीने विशिष्ट काळातील माहिती कमी श्रमात मिळते.

२.सर्वेक्षण हे व्यक्तिच्या वैशिष्टयांशी संबंधित नसते.

३.सर्वेक्षण हे गुणात्मक असते तसेच संख्यात्मकही असते.

४.स्थानिक समस्यांचे शिघ्र निराकरण करण्यासाठी उपयोगी पडते.

३.२.संशोधनाची कार्यवाही :

समस्या निश्चिती

↓

आराखडा निर्मिती

↓

आराखडा सादरीकरण

↓

आराखडा अंतीम मंजूरी

↓

संबंधित साहित्याचा आढावा

↓

साधन निवड व निर्मिती

↓

जनसंख्या व नमुना निवड

↓

साधनांच्या सहाय्याने माहिती गोळा करणे

↓

माहितीचे संकलन

↓

माहितीचे अर्थनिर्वचन

↓

निष्कर्ष व शिफारशी

↓

अहवाल लेखन

↓

सादरीकरण

प्रकरण १ .प्रस्तावना ः

या प्रकरणात विषय प्रवेश,संशोधनाचा विषय , संशोधन समस्येतील शब्दांचे अर्थ , संशोनाची उद्दिष्टे , संशोधनाचे महत्त्व ,व्याप्ती व मर्यादा व प्रकरणाचे नियोजन दिले जाईल .

प्रकरण २ .संबधित संशोधनाचा आढावा ः

या प्रकरणात संबंधित साहित्याचा अभ्यास , संबधित संशोधनाचे समालोचन , संबधित संशोधनाचे विषय , उद्दिष्टे ,कार्यपध्दती व निष्कर्ष दिले जातील .

प्रकरण ३ . संशोधनाची कार्यपध्दती ः

या प्रकरणात संशोधनात वापरण्यात आलेली कार्यपध्दती , संशोधनासाठी निवडलेला नमुना व संशोधनासाठी वापरण्यात आलेल्या साधनाविषयी माहिती दिली जाईल .

प्रकरण ४ .संकलित माहीतीचे पृथ्थकरण व अर्थनिर्वचन ः

या प्रकरणात संकलित माहितीचे पृथ्थकरण कोष्टके , आलेख , शेकडेवारी व सहसंबंध याव्दारे केले जाईल व त्यावरून संकलित माहितीविषयी अर्थनिर्वचन करण्यात येईल .

प्रकरण ५ .निष्कर्ष व शिफारशी ः

या प्रकरणात संकालित माहितीवरून निष्कर्ष काढले जातील . हे निष्कर्ष विद्यार्थ्यांच्या अभिरूची व त्यामधील विविधता तसेच समस्येबाबत असतील . निष्कर्षावरून समस्याबाबत शिफारशी दिल्या जातील .शिवाय पुढील संशोधनाासाठी विषय सुचविण्यात येतील .

३ .३ जनसंख्या ः

सदरचे संशोधन हे सोलापूर जिल्हयाशी संबंधित असलेने सोलापूर जिल्हयातील सर्व म्हणजे ४४ अध्यापक विदयालयातील विद्यार्थी व शिक्षक जनसंख्या असणार आहे .

३ .४ नमुना निवड ः

सोलापूर जिल्हयातील अध्यापक विद्यालयांची निवड पुढीलप्रमाणे केली जाणार आहे .

१ .सोलापूर जिल्हयामधील ११ तालुक्यांचा म्हणजे सर्वच तालुक्याचा विचार केला जाईल .

२ .सोलापूर जिल्हयामध्ये ४४ अध्यापक विद्यालयांतील साधारणत: ५० टक्के अध्यापक विद्यालयांची यादृच्छीक पध्दतीने निवड केली जाईल .

३ . सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षात प्रथमवर्षामध्ये शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांची निवड केली जाणार आहे. प्रत्येक अध्यापक विद्यालयातील ५० टक्के विद्यार्थ्यांची चाचणी देण्यासाठी यादृच्छीक पध्दतीने निवड केली जाईल .

४ . निवडलेल्या सर्व अध्यापक विद्यालयातील अध्यापकांची मुलाखतीसाठी निवड केली जाणार आहे .

३ .५ संशोधनाची साधने ः

सर्वेक्षण पध्दतीने विविध प्रकारची माहिती गोळा करावी लागते . सर्वेक्षण पध्दती सदयस्थितीचे वर्णन करते . वर्तमान संबंध , प्रचलीत परिपाठ ,दिसून येणा-या निष्ठा , दृष्टीकोन , अभिवृत्ती ,सुरू असलेल्या प्रक्रिया ,जाणवणारे परिणाम ,विकसीत होत असलेले विचारप्रवाह यांच्याशी सर्वेक्षण पध्दती संबंधित असते . सर्वेक्षण पध्दतीमध्ये केवळ माहिती संकलित करणे याला महत्व नसून माहितीचे मापन , वर्गीकरण , अर्थनिर्वचन व निष्कर्ष योग्य मिळविण्यासाठी संशोधकाला योग्य साधने निवडावी लागतात .

गृहितकांच्या मूल्यांकनासाठी ,उद्दिष्टांच्या मूल्यांकनासाठी व अंतिम निष्कर्ष काढण्यासाठी संशोधनाची साधणे उपयुक्त ठरतात . संशोधन साधनांत निरीक्षण , मुलाखत , प्रश्नावली , प्रमाणित चाचण्या ,पडताळा सूची , पदनिश्चयन श्रेणी , मतावली , समाजमिती तंत्र , प्रक्षेपण , गटचर्चा अशा विविध साधनांचा समावेश होतो .

माहिती संकलनासाठी पुढील साधनाचा वापर केला जाईल .

- अभिरूची शोधिका :

संशोधक एम . एन . पळसाने यांची ‘आपली आवड-निवड’ या प्रमाणीत अभिरूची शोधिकेचा वापर संशोधनासाठी करणार आहे. सदरील अभिरूची शोधिकेव्दारे १३ विविध क्षेत्रामधील अभिरूचीचे मापन केले जाते. शोधिकेच्या सहाय्याने एकाच वेळी कमी वेळामध्ये अधिक माहिती संकलित करता येते . ‘आपली आवड-निवड’ शोधिका विद्यार्थ्याची अभिरूची शोधण्यासाठी वापरली जाणार आहे .

- क्षमता कसोटी :

१) संशोधक वाय . सिंग व एम . भार्गव यांची ‘भावनिक परिपक्वता कसोटी’ या प्रमाणीत क्षमता कसोटीचा वापर संशोधनासाठी केला जाणार आहे. सदरील क्षमता कसोटीमध्ये ५ प्रकारच्या भावनिक क्षमतांचा समावेश आहे .

२) संशोधक आर.पी.श्रीवास्तव यांची 'सामाजिक परिपक्वता कसोटी' या प्रमाणीत क्षमता कसोटीचा वापर संशोधनासाठी करणार आहे. सदरील क्षमता कसोटीमध्ये वयानुरूप १७ विविध भागांचा समावेश आहे.

३.६ संख्याशास्त्रीय परिमाणे ः

संशोधकाने संकलीत केलेल्या माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचनासाठी काही संख्याशास्त्रीय परिमाणे वापरावी लागतात . प्रस्तुत संशोधनामध्ये आलेख , टक्केवारी, व सहसंवध या संख्याशास्त्रीय साधनांचा वापर केला जाणार आहे.

४. माहिति संकलन व अर्थानिर्वचन :

संधोधक अध्यापक विद्यालयातील विद्याथ्यांना व्यावायिक अभिरूची शोधिका व भावनिक परिपक्वता व सामाजिक परिपक्वता या क्षमता कसोटया वापरून तसेच शिक्षकांची मुलाखत घेवून माहिति संकलित केलेली असेल. सदरील माहितीवर प्रक्रिया व अर्थनिर्वचन करण्यात येईल.

❋ संशोधन कालावधीचे नियोजन ः

अ.न.	संशोधन कार्य	कालावधी
१	समस्या निश्चिती	२ महिने
२	संबंधित साहित्याचा आढावा	२ महिने
३	संशोधन आराखडा	२ महिने
४	माहितीचे संकलन	६ महिने
५	माहितीचे विश्लेषण	६ महिने
६	माहितीचा अन्वयार्थ	४ महिने
७	निष्कर्ष मांडणे	२ महिने
८	सारांश	२ महिने
९	छपाई व बांधणी	४ महिने
	एकूण	२ वर्ष ६ महिने

❋ संशोधन खर्चाचे अंदाजपत्रक ः

अ.नं.	खर्चाचा तपशील	रक्कम
१	संशोधन मापन साधन खरेदी	३५००
२	शोधिका , कसोटी व मुलाखत सूची - टायपिंग व झेरॉक्स	५०००
३	स्टेशनरी खर्च	५००
४	संबंधित साहित्य संकलन ,ग्रंथालय भेट , इंटरनेट इ.खर्च	३०००
५	माहिती संकलन	५०००
६	संशोधन अहवाल टायपिंग व बायंडींग	८०००
एकूण खर्च		२५०००

❋ संदर्भ ग्रंथ सूची ः

१.करंदीकर,सुरेश.,जगताप, ह.ना.,(एप्रिल २००६).अध्ययन अध्यापनाचे मानसशास्त्र. कोल्हापूर : फडके प्रकाशन.

२.कळके ,शिरगावे ,शेंडगे ,(सप्टेंबर २००८).अध्ययनार्थीचे मानसशास्त्र आणि अध्यापन प्रक्रिया. कोल्हापूर : फडके प्रकशन .

३.काळे, प्रेमला. (संपादक). (जून १९९०).मानसशास्त्रीय मापन.पुणे : मनोविकास प्रकाशन.

४.पळसाने, एम.एन.,(ऑगस्ट १९७७) आपली आवड-निवड हस्तपुस्तिका. पुणे : आनंद एजन्सी.

५.पंडीत बन्सी विहारी (१९९०)- शिक्षणातील संशोधन (संख्यात्मक व गुणात्मक) पुणे :

६.सिंग वाय. व भार्गव एम.,(२००२).भावनिक परिपक्वता कसोटी हस्तपुस्तिका. पुणे : आनंद एजन्सी.

७.श्रीवास्तव आर.पी.,(२००२).सामाजिक परिपक्वता कसोटी हस्तपुस्तिका. पुणे : आनंद एजन्सी.

1.Buch, M.B. (1991) .*Fourth Survey of Research in Education :Volumn I.* New Delhi : NCERT .

2.Buch, M.B. (1991) .*Fourth Survey of Research in Education : Volumn II.* New Delhi : NCERT .

3.Buch, M.B. (2006) .Sixth *Survey of Eductional Research : Volumn I.* New Delhi : NCERT .

4.Buch, M.B. (2007) .Sixth *Survey of Eductional Research : Volumn II.* New Delhi : NCERT .

5. https://shodhganga.inflibnet.ac.in

संशोधक	**मार्गदर्शक**
सुभाष रघुनाथ माळी	डॉ.सरीता नागोराव गाडेगांवकर